राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील
माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र.रामाआ-तक्रार क्र.१२४/२०१७/पुणे
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्रीमती सुभद्रा बबन गायकवाड — तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, जुन्नर ता.जुन्नर जि. पुणे — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, जुन्नर ता.जुन्नर जि. पुणे

**सुनावणी दिनांक :- १६/०९/२०२१**

तक्रारदार यांनी दि. १८/०९/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. .

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार व्हिडीओ कॉन्फरन्संद्वारे आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत तर तक्रारदार, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी त्यांचे माहिती अर्जात अशी तक्रार केली आहे की, " आयोगाने १५ दिवसात विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून

आजतागायत माहिती मिळालेली नाही, त्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी, माहिती पुरविण्याचे आदेश व्हावेत."

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे कथन केले की, "कामगार तलाठी यांचे मार्फत अर्जदारास वस्तुस्थितीदर्शक उत्तराची प्रत पुरविली आहे."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) आयोगाने व्दितीय अपील क्र. २०/२०१६ मध्ये ३०/०६/२०१७ रोजी आदेश दिलेला आहे. २) सदर आदेशाची अंमलबजावणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही. ३) अपील आदेशातील निर्देशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कामगार तलाठी यांचेमार्फत अर्जदारास वस्तुस्थितीदर्शक उत्तराची प्रत पुरविली असल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले. तथापि, याबाबत कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. ४) यावरुन आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येते, ५) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला विहित मुदतीत माहितीचे प्रदान केलेले नाही. त्यांची कृती अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग करणारी आहे, त्यामुळे ते अधिनियमाच्या कलम २० नुसार दंडात्मक कार्यवाहीस पात्र ठरतात.

सबब आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने दिलेल्या आदेशाचे तात्काळ काटेकोरपणे पालन करावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत परिपूर्ण माहिती प्रदान न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला असल्याने त्यांचे विरुध्द कलम २० मध्ये नमुद तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी

यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

वरील निर्देशासह प्रस्तुतचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(दिलीप ल. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. ६४१/२०२२/पुणे दिनांक - २१/५/२२

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-</u>

१. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

२/- संबंधित जबाबदार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जुन्नर, ता.जुन्नर जि. पुणे यांना जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे मार्फत (नोंदणीकृत टपालाद्वारे)- सदरचा आदेश बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.